# मंत्रिमंडळ निर्णय

## बैठक क्र. २०-२२

( विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशन (नागपूर) कालावधीतील बैठका )

**दिनांक : १८ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२२**

| बैठक क्रमांक | दिनांक | ठिकाण | निर्णयांची संख्या |
|---|---|---|---|
| २० | १८-१२-२०२२ | रामगिरी निवासस्थान,नागपूर | २ |
| २१ | २२-१२-२०२२ | विधानभवन, नागपूर | १३ |
| २२ | २९-१२-२०२२ | विधानभवन, नागपूर | ३ |
| | | एकूण | १८ |

# मंत्रिमंडळ निर्णय
# दि. १८ डिसेंबर २०२२
# ( एकूण निर्णय-२ )

१८ डिसेंबर २०२२
जलसंपदा विभाग

## म्हैसाळ उपसा सिंचन योजनेसाठी सौरऊर्जा प्रकल्प

म्हैसाळ उपसा सिंचन योजनेच्या वीज देयकांचा प्रश्न निकाली काढण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून सौरऊर्जा प्रकल्पासाठी केएफडब्ल्यू या जर्मन बँकेकडून कर्ज घेण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या प्रकल्पासाठी या बँकेकडून १ हजार १२० कोटी रुपये कर्ज मिळणार असून राज्य शासनाचा हिस्सा ४७४ कोटी रुपयाचा राहणार आहे. या बँकेसोबत महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळामार्फत आवश्यक तो करार करण्यात येईल.

-----o-----

१८ डिसेंबर २०२२
जलसंपदा विभाग

## कृष्णा कोयना उपसा सिंचन योजनेच्या सुधारित प्रकल्पास मान्यता

कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पाच्या ८ हजार २७२ कोटी ३६ लाख एवढया किंमतीच्या सुधारित अहवालास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

ताकारी उपसा सिंचन योजनेद्धारे एकूण ४ टप्प्यामध्ये ९.३४ अघफू पाणी उचलून सांगली जिल्ह्यातील खानापूर, तासगाव, मिरज, पलूस, कडेगाव आणि वाळवा या तालुक्यातील २७ हजार ४३० हेक्टर क्षेत्राला सिंचित करण्याचे नियोजन आहे. त्याचप्रमाणे म्हैसाळ उपसा सिंचन योजनेद्धारे एकूण ६ टप्प्यांमध्ये १८.४४ अघफू पाणी उचलून सांगली जिल्ह्यातील मिरज, कवठेमहांकाळ, तासगाव, जत आणि सोलापूर जिल्ह्यातील सांगोला आणि मंगळवेढा या तालुक्यातील ८१ हजार ६९७ हेक्टर क्षेत्र सिंचित करण्याचे नियोजन आहे.

या म्हैसाळ सिंचन योजनेच्या विस्तारित जत उपसा सिंचन योजनेद्धारे ५ अघफू पाणी सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील कर्नाटकाच्या सीमाभागातील वंचित ४८ गावांचा २६ हजार ५०० हेक्टर क्षेत्रास देण्यात येणार आहे. अशा प्रकारे कृष्णा कोयना उपसा सिंचन योजनेतून १ लाख ३५ हजार ६२७ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार आहे.

-----o-----

# मंत्रिमंडळ निर्णय
# दि. २२ डिसेंबर २०२२
# ( एकूण निर्णय-१३ )

२२ डिसेंबर २०२२
विधि व न्याय विभाग

**विविध ठिकाणी न्यायालयांची स्थापना**

पुणे, सोलापूर, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यात दिवाणी तसेच जिल्हा आणि ग्राम न्यायालय स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

पुणे जिल्ह्यातील वेल्हा येथे तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती येथे ग्राम न्यायालय त्याचप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातील माढा येथे दिवाणी न्यायालय वरिष्ठस्तर आणि गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करून पद निर्मिती करण्यासही मान्यता देण्यात आली.

-----०-----

२२ डिसेंबर २०२२
गृहनिर्माण विभाग

**धारावी पुनर्विकासासाठी अदानी प्रॉपर्टीजच्या निविदेस मान्यता**

धारावी अधिसूचित क्षेत्राकरिता मुख्य भागीदार म्हणून अधिकत्तम निविदादार म्हणून अदानी प्रॉपर्टीज यांच्या ५०६९ कोटी रुपयांच्या निविदेस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

विशेष हेतू कंपनी मॉडेलच्या अंतर्गत त्वरित अंमलबजावणी सुरु करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, धारावी पुनर्विकास प्रकल्प व झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

-----०-----

२२ डिसेंबर २०२२
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

## आयटीएम कौशल्य विद्यापीठास मान्यता

इन्स्टीट्युट फॉर टेक्नॉलॉजी अँड मॅनेंजमेंट या संस्थेचे आयटीएम कौशल्य विद्यापीठ खारघर येथे कायम स्वयंअर्थसहाय्यीत तत्वावर सुरु करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

२०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून हे विद्यापीठ सुरु करण्यात येईल. या विद्यापीठाचे विधेयक विधिमंडळासमोर मांडण्यात येईल.

-----०-----

२२ डिसेंबर २०२२
मृद व जलसंधारण विभाग

## जलसंधारण महामंडळाला स्वतंत्र लेखाशिर्ष

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडील छोट्या योजना झपाट्याने सुरु करण्यासाठी त्यांच्याकडील भांडवलास राज्य शासनाचा हिस्सा म्हणून १० हजार कोटी रुपये इतकी रक्कम महामंडळाच्या स्थापनेच्या तारखेपासून २५ वर्षाच्या कालावधीमध्ये योग्य हप्त्यात विभागण्याची सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

याशिवाय महामंडळासाठी सहाय्यक अनुदाने व अर्थसहाय्य याकरिता स्वतंत्र लेखाशिर्ष आणि अर्थसंकल्पीय तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली.

-----०-----

२२ डिसेंबर २०२२
ऊर्जा विभाग

**ग्रामीण भागातील वीज देयक थकबाकीपोटी**
**महावितरण कंपनीस ३७७५ कोटी रुपये**

सर्व जिल्हा परिषदा, क वर्ग नगरपरिषदा व नगरपंचायतीकडील थकीत वीज देयकावरील व्याज व दंड माफ करून देयकांची ३ हजार ७७५ कोटी रुपयांची थकबाकी महावितरण कंपनीस शासनामार्फत देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

यामुळे ग्राम विकास विभागाकडील व्याज आणि विलंबाच्या आकारापोटी ३ हजार ६८२ कोटी इतकी रक्कम माफ होणार असून ३ हजार ७७५ कोटी रुपयांची मूळ थकबाकी ग्राम विकास विभाग आणि नगर विकास विभाग महावितरण कंपनीस मार्च २०२३ पर्यंत मिळणार आहे. नगर विकास विभागाकडील क वर्ग नगरपरिषद व पंचायती यांच्याकडील व्याज व विलंब आकारापोटी १८८ कोटी ६४ लाख इतकी रक्कम माफ होणार असून १८६ कोटी २५ लाख इतकी मूळ थकबाकी महावितरण कंपनीस देण्यास येईल.

-----०-----

२२ डिसेंबर २०२२
पदूम विभाग

**पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांना इंटर्नशीप भत्ता**

पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांना इंटर्नशीप (आंतरवासीता) करिता ११ हजार रुपये प्रती विद्यार्थी प्रती महिना देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

एक वर्षासाठी हा भत्ता देण्यात येणार असून मत्स्यविज्ञान अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ६ महिन्याच्या कालावधीसाठी इंटर्नशीप भत्ता म्हणून ८ हजार रुपये तसेच दुग्धतंत्रज्ञान अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ६ महिन्याच्या कालावधीसाठी ८ हजार रुपये भत्ता प्रति महिना देण्यात येईल. या भत्त्यापोटी एकूण ४३४ लाख ४० हजार एवढा खर्च येणार असून २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून तो लागू करण्यात येईल.

-----०------

२२ डिसेंबर २०२२
सामाजिक न्याय विभाग

## विमान निर्मिती संशोधनासाठी १२ कोटींचे आर्थिक सहाय्य

विमान निर्मिती संशोधनासाठी कॅप्टन अमोल शिवाजी यादव यांच्या थ्रस्ट एअरक्राफ्ट प्रा.लि.यांना १२ कोटींचे आर्थिक सहाय्य विशेष बाब म्हणून देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

बार्टी संस्थेच्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून हे अनुदान देण्यात येणार आहे. हा कारखाना सुरु झाल्यास पहिल्या १० वर्षात १०० विमानांची निर्मिती शक्य असून हजारो रोजगार निर्माण होतील.

-----o------

२२ डिसेंबर २०२२
नियोजन विभाग

## मित्र संस्थेसाठी सह मुख्य कार्यकारी अधिकारी पद

महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन-मित्र या संस्थेवर सह मुख्य कार्यकारी अधिकारी हे पद निर्माण करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

मित्रच्या कार्यकारी मंडळात मुख्य कार्यकारी अधिकारी, १० विकासक क्षेत्र प्रमुख व संचालक, अर्थ व सांख्यिकी असे १२ सदस्य आहेत. याशिवाय सह मुख्य कार्यकारी अधिकारी हे पद देखिल निर्माण करण्यास कार्यात्तर मंजुरी देण्यात आली.

-----o-----

२२ डिसेंबर २०२२
उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## राष्ट्रीय विधि विद्यापीठाच्या इमारतीसाठी २२२ कोटीस मान्यता

औरंगाबाद येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठातील प्रशासकीय इमारत, ग्रंथालय, लेक्चर हॉल बांधण्यासाठी २२२ कोटी ६३ लाख रुपये खर्चास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

औरंगाबाद येथे या विद्यापीठासाठी कांचनवाडी येथील ५० एकर जागा शासनाने दिली असून हे विद्यापीठ २०१७-१८ पासून सुरु करण्यात आले आहे. या बांधकामापैकी ग्रंथालय व प्रशासकीय इमारतीसाठी १२२ कोटी ६३ लाख रुपये टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यात येतील.

-----o-----

२२ डिसेंबर २०२२
नगर विकास विभाग

## नॅकोफ इंडिया या संस्थेस जेनेरीक औषधी दुकाने सुरु करण्यास मान्यता

नॅकोफ इंडिया संस्थेस स्थानिक नागरी संस्थांच्या रुग्णालय परिसरात अमृत स्टोअर्सच्या धर्तीवर जेनेरीक औषधे सुरु करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

ही संस्था केंद्र पुरस्कृत बहुराज्यीय सहकारी संस्था असून महाराष्ट्रासह २१ राज्यात या संस्थेच्या ७२ शाखा आहेत. या संस्थेने प्रधानमंत्री जनऔषधी केंद्र देखील विविध राज्यात स्थापन केली आहेत.

-----०-----

२२ डिसेंबर २०२२
उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## स्वयं-अर्थसहाय्यीत या विद्यापीठांच्या शुल्कांमध्ये एकसमानता आणणार

राज्यातील स्वयं-अर्थसहाय्यीत विद्यापीठांच्या शुल्कांमध्ये एकसमानता आणण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

राज्यात २३ स्वयं-अर्थसहाय्यीत विद्यापीठे २०१४ पासून असून त्यांच्या फी रचनामध्ये एकसमानता आणण्याची गरज होती. त्यानुसार या विद्यापीठांच्या अधिनियमातील कलम ३६ ची तरतूद बदलून सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार आता फी रचना आढावा समितीच्या मान्यतेसाठी या विद्यापीठांना विविध अभ्यासक्रमांच्या फीची रचना पाठवावी लागेल.

-----०-----

२२ डिसेंबर २०२२
महसूल विभाग

## नागपूर इंडस्ट्रियल इस्टेट भाडेपट्टा नुतनीकरण दस्तावरील मुद्रांक शुल्क माफ

छोट्या उद्योजकांना लाभ मिळावा म्हणून नागपूर इंडस्ट्रियल इस्टेट आणि जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर यांच्यामधील भाडेपट्टा नुतनीकरण दस्तावर मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

हे मुद्रांक शुल्क माफ केल्यामुळे नागपूर शहरातील मौजा वांजरा आणि म्हसाळा येथील औद्योगिक वसाहतीमधील सूक्ष्म, मध्यम आणि लघु उद्योग यातून काम करणाऱ्या स्थानिक लोकांना मोठा फायदा होईल. त्याचप्रमाणे या परिसराचा विकास होण्यासही हातभार लागणार आहे. भाडेपट्टा मुदत संपल्याने अनेक उद्योगांना बँकांचा कर्ज पुरवठा मिळू शकणार नाही अशी परिस्थिती लक्षात घेता हे मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

-----०-----

२२ डिसेंबर २०२२
शालेय शिक्षण विभाग

## शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ

राज्यातील शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

यानुसार प्राथमिक व उच्च माध्यमिक शिक्षण सेवकांना १६ हजार रुपये (सध्या ६ हजार रुपये), माध्यमिक शिक्षण सेवकांना १८ हजार रुपये (सध्या ८ हजार रुपये) आणि उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण सेवकांना २० हजार रुपये (सध्या ९ हजार रुपये) अशी वाढ १ जानेवारी २०२३ पासून लागू करण्याचा निर्णय झाला. याचा लाभ ७ हजार १३१ शिक्षण सेवकांना होईल.

-----०-----

# मंत्रिमंडळ निर्णय
# दि. २९ डिसेंबर २०२२
# ( एकूण निर्णय-३ )

२९ डिसेंबर २०२२
जलसंपदा विभाग

## पेंच प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता

नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यातील पेंच प्रकल्पाच्या १ हजार ६८५ कोटी ८८ लाख इतक्या किंमतीच्या सुधारित खर्चास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या प्रकल्पामुळे नागपूर व भंडारा जिल्ह्यातील १ लाख ४ हजार ९१४ हेक्टर शेतीला सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

-----o-----

२९ डिसेंबर २०२२
विधि व न्याय विभाग

## केज येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय

बीड जिल्ह्यातील केज येथे जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या न्यायालयासाठी १९ नियमित पदे निर्माण करण्यात येतील. तसेच बाह्य यंत्रणेद्वारे पाच पदे भरण्यात येतील. तसेच सरकारी वकील कार्यालयासाठी देखील ३ नियमित पदे आणि १ बाह्य यंत्रणेद्वारे अशी एकूण ४ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली.

-----o-----

२९ डिसेंबर २०२२
सहकार विभाग

## अटल अर्थ सहाय्य योजनेस मुदतवाढ

राज्यातील सहकारी संस्थांच्या वाढीसाठी अटल अर्थ सहाय्य योजनेत मुदतवाढ देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

ही योजना २०१९ पासून लागू करण्यात आली होती. या योजनेतून शेतीपूरक व्यवस्था मजबूत करणे आणि स्थानिक गरजांनुसार नाविन्यपूर्ण प्रकल्पांसाठी अर्थसहाय्य देण्यात येते. या योजनेसाठी आवश्यक ७२ कोटी ४२ लाख रुपये निधी पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाकडे प्राप्त प्रस्तांवापैकी ४२८ प्रस्तावांना प्राधान्याने कर्ज आणि अनुदान देण्याची कार्यवाही केली जाईल.

-----o-----